N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** सांगली शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0602 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/12/2024 06:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 17/12/2024
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/12/2024
**Time From (वेळेपासून):** 15:53 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/12/2024 **Time (वेळ):** 06:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/12/2024 06:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भारती विद्यापीठाचे पतंगराव ,कदम महाविद्यालय सांगलीवाडीचे,गेटचे बाजूस सांगली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्रीमती गिता बापू क्षीरसागर

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1977

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | सीके हाईट्स अपार्टमेंट, जी-1,सांगलीवाडी ता मिरज,सांगली ,सांगली शहर, सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | सीके हाईट्स अपार्टमेंट, जी-1,सांगलीवाडी ता मिरज,सांगली ,सांगली शहर, सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9730160230

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती मनिषा नितीन कोगनोळीकर | उर्फ भडेकर | | 1. शारदानगर, पोतदार हायस्कुल, शेजारी, सांगली ,सांगली शहर, सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
वर्दी जबाब दि. 18.12.2024

मी श्रीमती गिता बापू क्षीरसागर, वय 47 वर्ष, व्यवसाय:- किराणा दुकान रा. सीके हाईट्स अपार्टमेंट, जी-1, सांगलीवाडी ता.मिरज, जि. सांगली. मो.नं. 9730160230

मी वरील ठिकाणी माझा मुलगा मंथन व नीरज यांचेसह राहणेस आहे. माझे सांगलीवाडी दत्त चौक येथे किराणा मालाचे दुकान असून त्यावर आमचा उदरनिर्वाह चालत असतो.

मी एचडीबी बँक येथून सुमारे अडीच वर्षापुर्वी 2 लाखाचे पर्सनल लोन काढले होते. सदरचे लोन मला बँकेतील कर्मचारी भारत माने याने मंजूर करून दिले होते. त्यातुन माझी व भारत माने यांची ओळख झाली होती. त्यावेळी भारत माने याने मला तो व्याजाने पैसे देत असल्याचे सांगितले होते. त्यानंतर मी भारत माने यांचेकडून सुमारे 2 वर्षापुर्वी 1 लाख रूपये 10 टक्के व्याजाने घेतले होते. तसेच माझा भाचा अविनाश जाधव यांनी देखील भारत माने यांचेकडून 1 लाख रूपये 10 टक्के व्याजाने घेतले होते. मी भारत माने यास दर महिन्याला व्याजाची रक्कम 10,000/- रूपये देत होते.

त्यानंतर मागील 6 महिन्यापासून आमचे आर्थिक परिस्थीतीमुळे मला व्याजाची रक्कम भारत माने यास देणेची झाली नाही. त्यामुळे भारत माने हा मला वरचेवर मी घेतलेली मुद्दल रक्कम परत करणेसाठी माझेकडे तगादा लावला असून तो माझ विरूध्द पोलीस ठाणेस तक्रार देणार असल्याची भिती घालत होता.

त्यानंतर दि. 25.11.2024 रोजी विश्रामबाग पोलीस ठाणे येथील भडेकर महिला पोलीस यांनी मला फोन करून माझेविरूध्द भारत माने, रा.कुपवाड याने फसवणुकीचा व दमदाटी केलेचा तक्रारी अर्ज दिला असून मला चौकशीकरीता त्याचदिवशी हजर राहणेस सांगितले होते. परंतू मी गावी असल्याने त्यांना 2 दिवसांनी पोलीस ठाणेस येत असल्याचे सांगितले. त्यावेळी भडेकर महिला पोलीस यांनी माझे व्हॉट्सअप नंबर 9730160230 वर त्यांचे व्हॉट्सअप नंबर 9011368731 वरून "नोटीस सी.आर.पी.सी. 149, पोलीस ठाणे विश्रामबाग, दि. 25.11.2024 अन्वये, नॉ.कॉ.र.नं.624/2024, बी.एन.एस. कलम 351(2),352 वगैरे प्रमाणे नोटीस पाठविली होती.

त्यानंतर मी दि.27.11.2024 रोजी भडेकर महिला पोलीस यांची विश्रामबाग पोलीस ठाणे येथे जावून भेट घेतली. त्यावेळी भडेकर महिला पोलीस यांनी माझेविरूध्दचा तक्रारी अर्ज मला दाखविला. त्यामध्ये भारत माने यांनी मी त्यांना नोकरीचे आमिष दाखवून त्यांचेकडून 2 लाख रूपये घेतलेबाबत व त्यांना दमदाटी केलेबाबतची हकीकत नमूद आहे. त्यावेळी भडेकर पोलीस यांनी माझेविरूध्द प्राप्त तक्रारी अर्जावरून फसवणुकीचा गुन्हा दाखल होणार असून तुम्हाला अटक करावी लागणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मी भडेकर पोलीस यांना मी कोणाचीही फसवणूक केली नसल्याचे सांगून भारत माने याने माझेविरूध्द खोटा तक्रारी अर्ज केला असल्याचे सांगितले. त्यावेळी भडेकर पोलीस यांनी माझेविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व अर्ज चौकशीमध्ये मदत करण्यासाठी माझेकडे 50,000/- रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना आमची परिस्थीती नसल्याचे सांगून ऐवढे पैसे नसल्याचे सांगितले. त्यावेळी भडेकर पोलीस यांनी माझेविरूध्द गुन्हा दाखल करणेची भिती घालून मला पैशाची जुळणी करण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना थोडी मुदत मागितली होती.

त्यानंतर दि.11.12.2024 रोजी भडेकर पोलीस यांनी त्यांचे मोबाईल वरून मला फोन करून मला पैशाबाबत विचारणा केली होती. त्यानंतर भडेकर महिला पोलीस यांनी दि.14.12.2024 व दि.15.12.2024 रोजी मला वारंवार कॉल केला होता. भडेकर पोलीस ह्या माझेविरूध्द कारवाई करतील याचे भितीने व माझेकडे पैशाची जुळणी झाली नसल्याने मी भितीपोटी त्यांचा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर दि.15.12.2024 रोजी रात्री 12.50 वा चे दरम्यान माझे मोबाईलवर विश्रामबाग पोलीस ठाणेचे फोन नंबर 0233-2670033 वरून फोन आला होता. परंतू



Scanned with OKEN Scanner

खुप रात्र झाली असल्याने व भडेकर पोलीस यांचे भितीपोटी मी सदरचा कॉल रिसीव्ह केला नाही. भडेकर महिला पोलीस या माझेकडे पैशाची मागणी करणेसाठी मला वारंवार फोन करीत होत्या. मला भडेकर महिला पोलीस यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दि. 17.12.2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. उमेश पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना फोनव्दारे संपर्क करून व माझा मुलगा नीरज याचेसोबत समक्ष जावून पोलीस उपअधीक्षक श्री. उमेश पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांची एसीबी कार्यालयात भेट घेवून माझी भडेकर महिला पोलीस, विश्रामबाग पोलीस ठाणे यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार कळविली. त्यावेळी पाटील साहेब यांनी पोलीस निरीक्षक श्री विनायक भिलारे हे पुढील कारवाई करतील असे सांगितले. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून मला तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा तक्रारी अर्ज भिलारे साहेबांचे समक्ष हजर केला. मी दिले तक्रारी अर्जावर भिलारे साहेब यांनी वाचून सही केली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेवून माझी व पंचांची ओळख करून दिली.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून श्रीमती माधुरी अनुराग पाटील यांनी व पंच नं.2 म्हणून तुषार रमेश कांबळे यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचा समक्ष कथन केली व माझा तक्रारी अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर सहया केल्या.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझा मुलगा नीरज याचेसोबत एसीबी कार्यालयातून रवाना होवून त्रिकोणी बाग, सांगली येथे दाखल झालो. त्यानंतर भिलारे साहेब, पाटील साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनांनी सदर ठिकाणी दाखल झाले.

त्यानंतर भडेकर महिला पोलीरा यांचा ठाव-ठिकाणा निश्चित करण्यासाठी माझे मोबाईलवरून भडेकर यांचे मोबाईल वर कॉल करून पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल वरून भडेकर यांचे मोबाईल नंबर 9011368731 वर 15.24 वा चे सुमारास पंचासमक्ष कॉल केला असता त्यांनी माझेंशी माझे कामाबाबत चर्चा करून मला गणेश नाष्टा सेंटर समोरील बागेमध्ये येण्यास सांगितले. सदरचा कॉल भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.53 वा सुरु करून महिला अंमलदार विना जाधव यांचे मदतीने रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 माधुरी पाटील असे माझेकडील अँक्टीव्हा मोपेड क्र.एमएच 10 सीपी 6987 वरून रवाना होवून गणेश नाष्टा सेंटर समोरील क्रांतीसिह नाना पाटील उद्यान येथे दाखल झालो. त्यानंतर मी माझे मोबाईलवरून भडेकर महिला पोलीस यांना फोन करून बागेमध्ये आलो असल्याचे सांगितले. त्यावर भडेकर महिला पोलीस यांनी पाच मिनीटामध्ये येत असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने भडेकर महिला पोलीस हया आम्ही थांबलेल्या बागेमध्ये आल्या. त्यावेळी भडेकर यांनी माझेसोबत असले पंच नं.1 यांचेबाबत विचारणा केली असता मी त्यांना त्या माझी मैत्रीण असल्याची सांगितले. त्यानंतर मी त्यांची भेट घेवून त्यांचेशी कामाबाबत चर्चा केली. त्यावेळी भडेकर यांनी मला "तुमच कस कस काय हाय, सविस्तर जरा सांगा, काय कुठ पर्यंतचा विषय तुमचा झालाय काय करायच" असे विचारले असता मी त्यांना "तुम्हीच मला मार्गदर्शन करा" असे म्हणाले. त्यावर भडेकर त्यांनी "तुम्ही मला एक सांगा तुमच काय, एक मला प्रपोझल ठेवा, त्याप्रमाणे मी तुम्हाला सांगते की काय कस काय" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "कस करूया म्हणताय" असे विचारले असता भडेकर यांनी "प्रत्येक गोष्टीला पैशाचा विषय हाय खरा....तुम्ही सांगा मला त्याप्रमाणे मला काय पटतय बघते मी, एस ऑर नो म्हणते" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "आपण त्या दिवशी बोललेला त्या दिवशी...विषय कसा झालेला आपला" असे विचारले असता भडेकर यांनी "ते काय असेल ते पैसे मी देतो जुळणी करून आणुन....आणि विषय पैसे देवून संपवुया" असे म्हणाल्या. त्यानंतर त्यांचेत व माझेत कामा संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी मी भडेकर पोलीस यांना "आपला कितीचा विषय झाला" असे विचारले असता भडेकर यांनी "असु दे, एक्स वाय झेड" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "आपण पन्नास पर्यंत हे केल होत, पण आता मॅडम तेवढ आत्ता हे होत न्हाय ओ" असे म्हणाले. त्यावर भडेकर यांनी "मग त्याचा विषय कधी संपवनार, तुम्ही"असे बोलले असता मी त्यांना सासुबाई जरा सिरीयस असल्यामुळे विषय झाला नसल्याचे सांगितले.

त्यानंतर भडेकर यांनी मला "तुम्ही माझ्या पेमेंटच काय करणार हाय" असे विचारले असता मी त्यांना "किती, कस करु म्हणालाय आता" असे बोलले असता भडेकर यांनी "ते क्लेअर करून घ्या पहिले....बोललाय तस ते पुर्ण करा की मग, परत बघुया पुढ कस करायच मग आपण....आत्ता करा सगळ बघुया" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना



Scanned with OKEN Scanner

"किती आता पन्नासच्या पन्नास करायच?" असे विचारले असता भडेकर यांनी "करा" असे म्हणून माझेकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना "माझ्याकड तेवढ अव्हेलेबल न्हाय झाल....एक मित्र माझा देतो म्हणटलाय संध्याकाळी" असे म्हणाले. त्यावर भडेकर यांनी "आत्ता तुम्ही आणले न्हायत का" असे विचारून त्यांनी माझेकडे लागलीच पैशाची मागणी केली. त्यावर मी त्यांना आत्ता पैसे आणले नसल्याचे सांगितले. त्यावर भडेकर यांनी "अस नसतय मॅडम...असे सगळे विषय जे असतात ते जागेवरचे विषय असतात" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "करूया की, आज तुम्हाला सुट्टीच हाय, मला एक टाईम द्या मग" असे म्हणून त्यांना रक्कम कमी करणेची विनंती करून "पन्नासच तुम्हाला करायला लागणार" असे बोलले असता भडेकर यांनी "तेवढ करा तुम्ही" असे म्हणून "किती वाजेपर्यंत होऊ शकतय" असे विचारले असता मी त्यांना "एक संध्याकाळी आठ, साडेआठ पर्यंत मी फोन करते की तुम्हाला" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "त्याच्यानंतर पुढच कस सांगा मला" असे विचारले असता भडेकर यांनी "केसचा विषय काय करत नाय सोडा" असे म्हणाल्या.

त्यानंतर मी भडेकर यांना भारत माने हा व्याजाने पैसे देत असलेबाबत त्यांना सांगितले. त्यावर भडेकर यांनी मला टेन्शन घेवू नका, घाबरून जाण्यासारख वगैरे अस काय एकदम फासावर कोण देत नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी भडेकर यांना "आता कस करूया, मी तुम्हाला फोन करते, किती हुत्यात माझ्याकडन....पंचवीस हजार झाले पंचवीस हजार, तीस हजार झाले तीस हजार" असे म्हणाले. त्यावर त्यांनी "शक्यतो जास्त करा मॅडम..... जेवढ म्हंटलाय त्याप्रमाणे विषय संपवा" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "किती पन्नास, पन्नास हजार का" असे विचारले असता भडेकर यांनी "हा, ते करा, संपवा, परत आमच्याकडन कुठल काय हे तर होणार नाय ना" असे म्हणाल्या..

त्यानंतर भडेकर यांनी मला त्या सांगलीवाडीमध्ये येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी, भडेकर व पंच नं.1 माधुरी पाटील असे क्रांतीसिह नाना पाटील उद्यान येथून चालत गणेश नाष्टा सेंटर येथे जावून चहा घेत माझे कामाबाबत चर्चा केली.

त्यानंतर भडेकर यांनी मला "उद्या पोलीस स्टेशनला येण्यास सांगून आलेनंतर चर्चा करू, त्याला ही बोलावून घेते......त्याच्याकडन पण लिहून घेवूया तस आणि त्याप्रमाणे मी त्याला ताकीद देते असे सांगून मला उद्या येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच माधुरी पाटील असे आमचेकडील मोपेडने वाहनाने विश्रामबाग येथून रवाना होवून भिलारे साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी भिलारे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला व पंच नं.1 माधुरी पाटील यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली. मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने भिलारे साहेबांनी महिला पोलीस भडेकर यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, महिला पोलीस भडेकर यांनी माझ्याविरूध्द दाखल असले तक्रारी अर्जावरून माझ्याविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व अर्ज चौकशीमध्ये मदत करण्यासाठी माझ्याकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच भडेकर पोलीस यांनी मला त्या सांगलीवाडी येथे येणार असल्याचे सांगून लाच रक्कम सांगलीवाडी येथे घेवून येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर भिलारे साहेबांनी भडेकर महिला पोलीस यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन मला लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी त्यांना घरी जावून रक्कम घेवून येत असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्व त्रिकोणी बाग येथून रवाना होवून स्टेशन चौक येथे दाखल झालो.

त्यानंतर मी माझे मुलासोबत घरी जावून माझे शिल्लकीतील 50,000/- रूपये घेवून काही वेळाने भिलारे साहेब यांचे समक्ष स्टेशन चौक येथे हजर झाले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी सापळा कारवाईकरीता आवश्यक स्टाफ उपलब्ध करून घेतला. त्यानंतर आम्ही सर्व स्टेशन चौक येथून रवाना होवून बायपास रोडवरील श्रीदत्त नाष्टा सेंटर येथे दाखल झालो.

त्यानंतर मी 50,000/- रूपये भिलारे साहेब यांचेसमक्ष व दोन्ही पंचां समक्ष हजर केले. त्यावेळी श्री. भिलारे साहेब यांनी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. भिलारे साहेब व मी सही केली. श्री.भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पर्समध्ये ठेवल्या व भिलारे साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर भिलारे साहेबांनी भडेकर महिला पोलीस यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करून भडेकर यांचा सांगलीवाडी येथील नेमका ठाव-ठिकाणा निश्चित करण्यासाठी मला भडेकर पोलीस यांना कॉल



Scanned with OKEN Scanner

करण्याचे ठरविले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी दिले सुचनेवरून मी माझे मोबाईलवरून 20.10 वाजता भडेकर यांना कॉल केला असता, भडेकर महिला पोलीस यांनी सांगलीवाडी भारती विद्यापीठ कॉलेज येथे पाच मिनीटात येत असल्याचे सांगितले.

त्यानंतर भिलारे साहेबांनी भडेकर महिला पोलीस यांचेविरुध्द भारती विद्यापीठ कॉलेज सांगलीवाडी येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 20.31 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे महिला अंमलदार विना जाधव यांचे मदतीने रेकॉर्डला असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच माधुरी पाटील असे आमचेकडील मोपेड वाहनाने श्रीदत्त नाष्टा सेंटर, बायपास रोड येथून रवाना झालो. त्यावेळी मी गाडीवर असताना भडेकर यांचा मला कॉल आल्याने मी त्यांचा कॉल रिसीव्ह केला असता त्यांनी त्या भारती विद्यापीठ कॉलेज येथे आले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 माधुरी पाटील असे सांगलीवाडी येथील भारती विद्यापीठाचे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीवाडी येथील महावीर आईस्क्रीम येथे दाखल झालो. माझे पाठोपाठ भिलारे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने भारती विद्यापीठ कॉलेजचे समोर रोडकडेला दाखल झाले. त्यावेळी भडकेर महिला पोलीस हया महावीर आईस्क्रीम येथे थांबलेल्या होत्या. त्यावेळी मी व पंच नं. 1 यांनी भडेकर महिला पोलीस यांची भेट घेतली. त्यावेळी भडेकर पोलीस यांनी मला "हया तुमच्या बरोबर आहेत" काय असे म्हणून पंच नं.1 यांचेबाबत विचारणार केली असता मी त्यांना "मी हिला घेवूनच गाडीवरन गेलो" असल्याचे सांगितले. त्यानंतर मी भडेकर यांना महावीर आईस्क्रीम येथे बसण्याची विनंती केली असता भडेकर यांनी "आपण चालतच जाऊया पुढ" असे म्हणून मी, भडेकर व पंच नं.1 माधुरी पाटील असे तेथून चर्चा करीत भारती विद्यापीठ कॉलेजचे गेटजवळ गेलो. त्यावेळी भडेकर पोलीस यांनी मला "किती केलात तुम्ही, सगळ केलात पन्नास" असे विचारले असता मी त्यांना "तुम्ही पन्नासच म्हणला होता, पन्नास हजाराची सगळीच केली" असल्याचे सांगितले. त्यानंतर भडेकर यांनी मला उद्या पोलीस स्टेशनला येण्यास सांगून "मी सांगते कसे दाबून बोलायच....चांगल हे काय न करता दाबून बोलायच....तुम्हाला उद्या सांगते, ते काय करायच, कस काय करायच.....त्याच्याकडून लिहून घेतो मी" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "परत आणि मला कोणतरी प्रॉब्लेम करायला लागल तर मॅडम पुढ" असे बोलले असता भडेकर यांनी मला "मी हाय की....माझा नंबर घ्यायचा, एक केस चालू आहे म्हणायच पोलीस स्टेशनला.....त्याला काय सांगायच माझ्या पध्दतीन माझ्या भाषेत सांगतो मी" असे म्हणाल्या. त्यावेळी भडेकर महिला पोलीस यांनी हाताने इशारा करून माझ्याकडे पैशाची मागणी केल्याने मी माझे पर्समधील 50,000/- रूपये ॲन्थ्रासिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढून भडेकर पोलीस यांचेसमोर धरून "पन्नास आहेत बघा मोजून घ्या" असे म्हणाले असता भडेकर यांनी "नाय आसुदे, कुठ जात्यात..." असे म्हणून लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे अंगावरील जॅकेटच्या उजवे खिश्यामध्ये ठेवली. त्यानंतर मी माझी पर्स खाली टाकून लाच रक्कम स्विकारले बाबतचा पुर्व नियोजित इशारा केला.

लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व भिलारे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने भडेकर पोलीस यांना ताब्यात घेतले. तसेच त्यांचेकडील 50,000/- रुपये लाच रक्कम पंचा समक्ष पोलीसांनी ताब्यात घेतली.

सदर ठिकाणी भिलारे साहेब यांनी भडेकर महिला पोलीस यांना ताब्यात घेवुन नाव, गांव, वय, वर्ग विचारला असता त्यांनी त्यांचे नांव श्रीमती मनिषा नितीन कोंगनोळीकर उर्फ भडेकर, वय-42 वर्षे, मपोह/1908, विश्रामबाग पोलीस ठाणे, रा.शारदानगर, पोतदार हायस्कुल शेजारी, सांगली असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापूर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही ॲन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 17.12.2024 रोजी 15.53 वा. ते 16.54 वा. च्या दरम्यान लोकसेविका श्रीमती मनिषा नितीन कोंगनोळीकर उर्फ भडेकर, वय-42 वर्षे, मपोह/1908, विश्रामबाग पोलीस ठाणे यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरुपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझेविरुध्द दाखल असले तक्रारी अर्जावरुन फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व अर्ज चौकशीमध्ये मदत करण्यासाठी स्वत: करीता माझ्याकडे पंचांसमक्ष 50,000/- रूपये लाचेची मागणी केली असून सापळा कारवाई वेळी लोकसेविका श्रीमती मनिषा नितीन कोंगनोळीकर उर्फ भडेकर यांनी माझेकडे लाचेची मागणी करून लाच रककम 50,000/- रूपये पंचांसमक्ष भारती विद्यापीठाचे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीवाडीचे गेटचे बाजूस स्विकारली आहे, म्हणून माझी लोकसेविका श्रीमती मनिषा नितीन कोंगनोळीकर उर्फ भडेकर, वय-42 वर्षे, मपोह/1908, विश्रामबाग पोलीस ठाणे रा.शारदानगर, पोतदार हायस्कुल शेजारी, सांगली यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिन्ट काढल्यानंतर मी वाचून



Scanned with OKEN Scanner

पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SANJAY SHIVAJIRAO MORE
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): PBMAH72651
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.) @BShirsagar

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

@BShirsagar

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJAY SHIVAJIRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH72651



[signature] pol. 7/22
ठाणे अंमलदार
...गली शहर पोलीस ठाणे

Scanned with OKEN Scanner